रे.के. नं. ६७ /२०२०

नि. क्र. ४४

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ यांचा जबाब शथपेवर सुरु.</u>**

**नाव** – बबन धोंडु कोटकर,

**वय**– ६० वर्षे, **व्यवसाय**– सध्या काही नाही,

**सध्या राहणार –** मोर्डे, गवळीवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>सरतपास – अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीम. ए. व्ही. गुरुपातगोळ यांच्याकडून</u> –**

०१. मोर्डे येथे माझ्या सोबत माझा भाऊ शांताराम कोटकर, सिताराम कोटकर, अनिता कोटकर, संजना कोटकर हे राहतात. आम्ही मुंबईला येऊन जाऊन असतो. आमच्या शेजारी रविंद्र राजाराम कोटकर राहतात.

०२. दि. १९/०८/२०२० रोजी मी मोर्डे येथे होतो. त्या दिवशी मी कामानिमित्त बाजूला गेलो होतो. नंतर आवाज आला, आरडा ओरड झाली. रविंद्रने माझी पुतणी संजनाच्या डाव्या हाताच्या दोन बोटांवर कोयती मारली. तसेच अनिताच्या डाव्या बावशावर कोयती मारली. मी पाहीले की, कोयतीला रक्त लागले होते, तसेच जमिनीवर रक्त सांडले होते.

०३. मी आलो त्यावेळी त्या दोघी डॉक्टरकडे निघाल्या होत्या. त्यानंतर त्या साखरपा येथे उपचारा करता गेल्या व त्यानंतर रत्नागिरी येथे त्यांना दाखल करण्यात आले. मला ती कोयती दाखवल्यास मी ओळखु शकतो. रविंद्र कोटकर आज न्यायालयात हजर आहे.

०४. साक्षीदाराला आता सदरची मुद्देमाल कोयती दाखवण्यात आली. ही तीच कोयती आहे. मी त्या कोयतीला ओळखु शकतो. पोलीसांनी या घटनेविषयी

दुस–या दिवशी माझ्याकडे चौकशी केली होती. मी त्यांना साखरपा दुरक्षेत्रात या घटनेविषयी माहीती दिली होती.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेकडुन</u> –**

०५. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी माझ्या सोबत न्यायालयात शांताराम आणि संजना कोटकर आलेले आहेत. मी आणि शांताराम एकाच घरात गावी मोर्डे येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे शांताराम आणि सिताराम यांच्याशी संबंध चांगले आहेत.

०६. आमच्या घराच्या मागे वाडा पाच मिनीटांच्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाडा आणि आमच्या घराच्या मध्ये गावातील इतर लोकांची देखील घरे आहेत. ती घरे संजय कोटकर, सोनु बाबू वाजे, चंद्रकांत कोटकर यांची आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२० साली ऑगस्ट महीन्यात या घरांमध्ये माणसं वास्तव्यास होती.

०७. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटना घडली त्यावेळी मी वाडीत गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी घरापासून पाच ते सहा मिनीटांच्या अंतरावर होतो.

**प्रश्न** – तुंम्ही तथाकथीत घटना प्रत्यक्ष घडताना पाहीली नाही?

**उत्तर** – सदर प्रश्नाचे उत्तर साक्षीदार हो किंवा नाही, दोन्हीही देत नाही.

**प्रश्न** – सदरची तक्रार तुमच्या भावाच्या पत्नीने केल्याने तीला मदत करण्यासाठी तुंम्ही साक्ष देत आहात?

**उत्तर** – सदर प्रश्नाचे उत्तर साक्षीदार हो किंवा नाही, दोन्हीही देत नाही.

**प्रश्न** – सदरच्या घटनेविषयी पोलीसांनी तुमच्याकडे व्यक्तीशः चौकशी केली असे काही घडले नाही?

**उत्तर** – सदर प्रश्नाचे उत्तर साक्षीदार हो किंवा नाही, दोन्हीही देत नाही.
हे म्हणणे खरे आहे की, दत्ताराम धोंडु वाजे, रमेश काबदुले यांच्याशी आमच्या कुटुंबियांचे संबंध चांगले आहेत.

**प्रश्न** – अशा प्रकारची कोयती कोकणामध्ये प्रत्येकाच्या घरामध्ये मिळू शकते?

**उत्तर** – सदर प्रश्नाचे उत्तर साक्षीदार हो किंवा नाही, दोन्हीही देत नाही.

०८. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि त्याचा भाऊ सध्या मोर्डे गवळीवाडी येथे राहत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मोर्डे गवळीवाडीमध्ये राहू नये असे आमचे भावकीचे म्हणणे होते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कुटुंबियांचे आरोपीच्या कुटुंबियांशी संबंध खराब होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुतणीला हाताच्या बोटांना दुखापत झाली होती तसेच भाऊजय अनिता हीला डाव्या खांद्याला दुखापत होऊन रक्त येत होते हे मी खोटे नमुद करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा सांगितला आहे व आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास नाही**.

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.12.23 17:12:17 +0530

**(श्रीमती श्रुती ह. पाटील)**

**दिनांक २३/१२/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**